**वाचले :-**

१) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.
२) साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
४) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.११/२०२० दि.१४/०३/२०२०.
५) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.१२/२०२० दि.१६/०३/२०२०.
६) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.२१/२० दि.१४/०४/२०२०.
७) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/मनाईआदेश/एस.आर.क्र.२२/२० दि.१४/०४/२०२०.
८) गृह मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील आदेश क्र.४०-३/२०२०-DM-I(A) दि.०१/०५/२०२०
९) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.०२/०५/२०२० व ०३/०५/२०२०.

---

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.२३/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दिनांक ०३/०५/२०२०

**आदेश :**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करणे आवश्यक असल्याने उपोद्‌घातातील अ.क्र.६ व ७ अन्वये पालघर जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक ०३/०५/२०२० पर्यंत निर्गमित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्‌घातातील अ.क्र.८ व ९ अन्वये केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांनी दि.१७/०५/२०२० पर्यंत राज्यामध्ये लॉकडाऊन लागू राहील असे जाहीर केले आहे. तसेच सदर आदेशानुसार पालघर जिल्हयाचा समावेश "**Red Zone**" मध्ये करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने पालघर जिल्हयात कायदा व सुव्यवस्था राखणेकामी व जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून सदरचे मनाई आदेश दि.१७/०५/२०२० पर्यंत लागू ठेवणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये पालघर जिल्हयामध्ये **दिनांक ०४/०५/२०२० रोजी रात्री १२.०१ ते दिनांक १७/०५/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत मनाई आदेश लागू करीत आहे**.

सदरहू आदेश लागू झाल्यापासून पुढील नियमावली व उपाययोजना लागू करण्यात येत आहे.

१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रासह संपूर्ण पालघर जिल्हयाचा समावेश "**Red Zone**" मध्ये करण्यात येत आहे.

२) **प्रतिबंधित क्षेत्राची (Containment Zone) निश्चिती व मार्गदर्शक तत्वे (Protocol):**

अ) सार्वजनिक आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालयाने निश्चित केलेल्या मागदर्शक तत्वानूसार Red

Zone (हॉटस्पॉट) व Orange Zone मध्ये जिल्हा प्रशासनाकडून प्रतिबंधित क्षेत्र निर्धारीत करण्यात येईल. प्रतिबंधित क्षेत्राच्या सिमा पुढील बाबींचा विचार करून करण्यात येईल. कोरोनाग्रस्त व त्यांच्या संपर्कातील व्यक्तींचे स्थान, कोरोनाग्रस्त व त्यांच्या संपर्कातील व्यक्तींचे भौगोलिक वितरण, आवश्यक त्या उपाययोजनांची अंमलबजावणी करता येईल अशी परिघीय सिमा निश्चित करण्यात येईल.

ब) प्रतिबंधित क्षेत्राची सिमा नागरी भागात रहिवाशी कॉलनी, मोहल्ला, महानगरपालिका वार्ड, महानगरपालिका झोन, पोलीस स्टेशनची हद्द, शहर आदींच्या आधारे निश्चित करण्यात येईल. ग्रामीण भागात खेडेगांव, गांवाचा समूह, ग्रामपंचायत, पोलीस स्टेशनची हद्द, गट यांच्या आधारे निश्चित करण्यात येईल.

क) सार्वजनिक आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालयाने ठरवून दिलेल्या SOP नूसार कन्टेनमेंट झोनमध्ये सखोल निगराणी ठेवण्यात यावी. प्रतिबंधित क्षेत्रामधील सर्व नागरीक आरोग्य सेतू ॲप वापरत असल्याची स्थानिक स्वराज्य संस्थेने खात्री करावी.

ड) स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रतिबंधित क्षेत्रामध्ये खालील कामे करावीत.

अ) रुग्णाच्या संपर्काधिन व्यक्तींची नोंदणी करुन त्यांची पडताळणी करणे. (Contact tracing)

ब) स्थानिक वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ठरवून दिलेल्या जोखीमेच्या आधारे नागरीकांचे संस्थात्मक अथवा घरगुती विलगीकरण. आढळून येणारी लक्षणे, कोरोना ग्रस्त रुग्णांशी आलेला संपर्क, कोरोनाग्रस्त भागात प्रवासाचा इतिहास आदीच्या आधारे जोखीम निश्चित करण्यात यावी.

क) SARI आजाराने ग्रस्त रुग्ण, Influenza like illness (ILI) आणि सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने निर्धारित केलेले लक्षणे असणाऱ्या सर्व रुग्णांची तपासणी करावी.

ड) पथकांची नियुक्ती करून सदर पथकामार्फत प्रत्येक घरी जावून सर्व्हे करावा.

इ) निश्चित केलेल्या प्रोटोकॉलनूसार सर्व रुग्णांची वैद्यकीय देखभाल ठेवावी.

ई) नागरीकांना प्रशिक्षीत करावे व त्यांचे समुपदेशन करावे. तसेच प्रभावी संपर्क प्रस्थापीत करावा.

इ) प्रतिबंधित क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी अत्याधिक काळजी घेण्याची गरज आहे. तेथे नागरीकांच्या आवागमणावर (Entry and Exit) प्रभावी नियंत्रण ठेवावे. यामध्ये केवळ वैद्यकीय आपतकालीन परिस्थिती व अत्यावश्यक वस्तु व सेवांचा पुरवठा करण्यास अपवाद राहील. सार्वजनिक आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालयाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाचा परिपूर्ण अंमल करावा.

**३) मनाई आदेशा दरम्यान पालघर जिल्हयात दिनांक १७ मे २०२० पर्यंत प्रतिबंधीत असलेल्या बाबी :**

अ) सर्व राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय प्रवासी हवाई वाहतूक वैद्यकीय सेवा, एअर ॲम्बुलन्स, सुरक्षा विषयक बाबी आणि गृहमंत्रालयाने परवानगी दिलेल्या बाबी वगळून बंद राहील.

ब) सर्व प्रकारची प्रवासी रेल्वे वाहतूक सुरक्षासंबंधीत बाबी व गृह मंत्रालयाने परवानगी दिलेल्या बाबी वगळता बंद राहील.

क) आंतर राज्य बसव्दारे होणारी प्रवासी वाहतूक गृह मंत्रालयाने परवानगी दिलेल्या बाबी वगळता बंद राहील

ड) आंतर राज्य व आंतर जिल्हा प्रवासी वाहतूक आरोग्य विषयक बाबी करीता व गृह मंत्रालयाने परवानगी दिलेल्या बाबी वगळता बंद राहील.

इ) पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व अंगणवाडी, सर्व सरकारी व खाजगी शाळा, जिल्हा परीषद

शाळा, अनुदानित/विनाअनुदानीत, सर्व आश्रमशाळा, निवासी आश्रमशाळा, महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था व कोचिंग क्लासेस बंद राहतील. तथापि ऑनलाईन/ दुरूस्थ शिक्षणाला परवानगी राहील.

ई) सर्व प्रकारच्या आदरातिथ्य सेवा बंद राहतील. मात्र आरोग्य/पोलीस/शासकीय अधिकारी/ आरोग्य विषयक कर्मचारी, लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या व्यक्ती जसे की, पर्यटक आणि अलगीकरासाठी आवश्यक असणारी आदरातिथ्य सेवा चालू राहतील.

फ) सर्व सिनेमा गृहे, मॉल्स, शॉपिंग कॉम्प्लेक्स, व्यायाम शाळा, क्रिडा संकूल, जलतरण तलाव, मनोरंजन केंद्रे, प्रेक्षागृहे, बार, सभागृहे, मंगल कार्यालये आणि एकत्रित जमण्याची ठिकाणी आणि तत्सम इतर ठिकाणे.

ग) सर्व सामाजिक/राजकीय/क्रिडा विषयक/मनोरंजन/शैक्षणिक/ सांस्कृतिक/धार्मिक कार्यक्रम/ इतर संमेलने.

ह) सर्व धार्मिक स्थळे तसेच इतर सर्व प्रार्थना स्थळे भाविकांना दर्शनासाठी बंद राहतील. सर्व धार्मिक सभा/परिषदा बंद राहतील.

४) **नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी व आरोग्यासाठी करावयाच्या उपाययोजना:**

अ) अत्यावश्यक बाबी वगळता संध्याकाळी ७.०० ते सकाळी ७.०० वाजेपर्यंत नागरीकांची हालचाल पुर्णपणे बंद राहील.

ब) ६५ वर्षावरील जेष्ठ नागरीक,यापूर्वी इतर आजार असलेल्या व्यक्ती, गरोदर महिला, १० वर्षाच्या खालील बालके,वैद्यकीय बाबी व अत्यावश्यक बाबी वगळता राष्ट्रीय निर्देशकानुसार घरी राहतील यांची दक्षता घ्यावी.

क) प्रतिबंधित क्षेत्रामध्ये (Containment Zone) OPD व मेडिकल क्लिनीक बंद राहतील. पंरतु हे Red Zone मध्ये सामाजिक अंतर व इतर सुरक्षा विषयक काळजी घेऊन चालू राहतील.

५) **प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये (Containment Zone) करावयाची कार्यवाही:**

अ) काटेकोर परिघीय नियंत्रण,

ब) प्रवेश व निर्गम (Entry / Exit) ठिकाणीची निश्चिती करणे.

क) नागरीकांचे हालचाल/आवागमन केवळ अत्यावश्यक वस्तु व सेवाच्या पुरवठयासाठी आणि वैद्यकीय आपत्कालीन परिस्थीती मध्ये होईल.

ड) तपासणी न करता नागरीकांचे लोंढे येणार नाही व त्यांची वाहतूक होणार नाही.

इ) परिघीय क्षेत्राच्या आत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या नागरीकांची नोंदणी ठेवण्यात येईल.

६) **Red Zone (हॉटस्पॉट) मध्ये करावयाची कार्यवाही (कन्टेनमेंट झोनच्या बाहेर):**

अ) उपरोक्त परिच्छेद क्रमांक ३ मध्ये प्रतिबंधीत केलेल्या बाबी शिवाय खालील नमुद बाबींना परवानगी असणार नाही.

१) सायकल रिक्षा आणि ऑटो रिक्षा
२) टॅक्सी आणि कॅब सेवा पुरविणाऱ्या आस्थापना
३) आंतर जिल्हा व जिल्हा अंतर्गत बस वाहतूक
४) केशकर्तनालये, स्पा आणि सलून

**ब) विशिष्ट बंधनासह खालील बाबी सुरु राहतील.**

१) परवानगी दिलेल्या बाबींसाठी नागरीकांची व वाहनांची हालचाल. चार चाकी वाहनात वाहन चालकाव्यतिरिक्त जास्तीत जास्त दोन प्रवाश्यांना परवानगी राहील. दुचाकी वाहनावर पाठीमागे बसणाऱ्या व्यक्तीना परवानगी असणार नाही.

२) वसई विरार महानगरपालिका क्षेत्र वगळून पालघर जिल्हयातील इतर क्षेत्रातील सर्व औद्योगिक गतिविधीना परवानगी राहील.

३) नागरी क्षेत्रातील बांधकामासंबधी-केवळ जागेवरील बांधकाम (ज्या ठिकाणी बांधकामाच्या ठिकाणीच मजूर उपलब्ध असून बाहेरुन मजूर आणण्याची आवश्यक्ता नाही) आणि पुनर्नविकरणीय उर्जा साधनाचे प्रकल्प यांना परवानगी राहील. ग्रामीण भागात बांधकाम विषयक सर्व बाबींना परवानगी राहील.

४) शहरी भागात (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रात) सर्व मॉल्स, व्यापारी संकुले, बाजारपेठा बंद राहतील. तथापी बाजारपेठातील व व्यापारी संकुलातील अत्यावश्यक वस्तुंची विक्री करणारी दुकाने सुरु राहतील.

अत्यावश्यक व अत्यावश्यक नसलेले अशी वर्गवारी न करता नागरी हद्दीमध्ये (महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत) **Containment Zone वगळता** सर्व स्वतंत्र (standalone) दुकाने, colony मधील दुकाने व रहिवासी संकुलातील दुकाने (पान, तंबाखुची दुकाने वगळून) सुरु राहतील. मात्र मुंबई महानगर प्राधिकरणातंर्गत (MMR) मध्ये येणाऱ्या वसई व पालघर तालुक्यांमध्ये जर एकाच लेन/रोड वर ५ पेक्षा जास्त दुकाने असल्यास अत्यावश्यक मालाची सर्व दुकाने सुरु राहतील व अत्यावश्यक नसलेली (पान, तंबाखुची दुकाने वगळून) इतर दुकाने ५ दुकानांच्या मर्यादेपर्यंत सम व विषम दिवशी सुरु ठेवणेबाबत स्थानिक प्राधिकरणाने नियोजन करावे.

तसेच ग्रामीण भागातील मॉल्स व्यतिरिक्त सर्व दुकाने चालू राहतील.

सर्व दुकानांचे ठिकाणी सामाजिक अंतर राखणे ***(दो गज की दुरी)*** बंधनकारक राहील.

५) अत्यावश्यक वस्तु, औषध, वैद्यकीय उपकरणे यासाठी दिली जाणारी ई-कॉमर्स सेवा चालु राहतील.

६) वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र वगळून पालघर जिल्हयातील अन्य क्षेत्रात खाजगी कार्यालये ३३ टक्के अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीसह चालु राहतील. इतर अधिकारी/यांना घरातुनच काम करणे आवश्यक आहे.

७) वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र वगळून पालघर जिल्हयातील अन्य क्षेत्रात जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद व सर्व सरकारी कार्यालये यांचे अधिनस्त गट-अ व गट-ब मधील सर्व अधिकारी व इतर कार्यालय प्रमुख १०० टक्के उपस्थितीसह चालू राहतील. या कार्यालयातील इतर कर्मचारी यांची ३३ टक्के उपस्थिती राहील. तथापि संरक्षण आणि सरक्षा सेवा, आरोग्य आणि कुटूंब कल्याण,पोलीस, कारागृह, होमगार्ड, नागरी सुरक्षा, अग्निशमन आणि अत्यावश्यक सेवा, आपत्ती व्यवस्थापन आणि संबंधीत सेवा, राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, जकात भारतीय अन्न महामंडळ, NCC, NXY आणि नगरपालिकामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा कुठल्याही प्रतिबंधाशिवाय सुरु राहतील. सामान्य जनतेला सेवा पुरविण्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध राहील यांची दक्षता घ्यावी.

८) मान्सुनपुर्व अत्यावश्यक असणारी सर्व प्रकारची कामे सुरु राहतील. यामध्ये इमारतीचे संरक्षण, वॉटर प्रुफींग पुरनियंत्रण, इमारतीचे स्थापत्य विषयक दुरुस्ती, धोकादायक इमारती पाडणे आदी कामे सुरु राहतील.

७. **कृषी संबंधीत :**

**अ) सर्व कृषि विषयक उपक्रम /कामे पुर्णपणे सुरु राहतील जसे की,**

१) शेतकरी व शेतमंजूरामार्फत शेतात केली जाणारी कामे

२) कृषि मालाची खरेदी करणाऱ्या संस्था (तुर, कापूस, हरभरा यांची किमान आधाभूत किंमतीने खरेदी करणाऱ्या संस्थासह)

३) कृषि उत्पन्न समितीव्दारे चालविण्यात येणाऱ्या मंत्री, शेतकरी समूह, शेतकऱ्याकडून करण्यात येणारी थेट खरेदी, या संदर्भाने कार्यरत असणाऱ्या सहकारी संस्था

५) कृषि साहित्याची विक्री करणारी केंद्र (टॅक्टर, सिंचनाशी संबंधित साहित्याची विक्री करणारे) त्यांचे सुटे भाग व त्यांची पुरवठा साखळी, कृषि साहित्याची दुरुस्ती करणारी दुकाने सुरु राहतील.

६) खते, किटकनाशके, बि-बियाणे व इतर कृषि विषयक आदाने यांची निर्मिती वितरण व किरकोळ विक्री करणारी दुकाने/केंद्रे.

७) कापणी व पेरणी संबंधातील यंत्रे जसे की, हारवेस्टर आणि इतर कृषि विषयक यंत्रणाची आंतर राज्य / आंतर जिल्हा आवागमण

**ब) पशुसंवर्धन विषयक खालील बाबी सुरु राहतील.**

१) दुग्धप्रक्रिया प्रकल्पाकडून होणारे दुध संकलन, प्रक्रिया, वितरण आणि विक्री तसेच दुग्धव्यवसायासाठी संबंधित दुग्धजन्य पदार्थाची वाहतूक व पुरवठा करणारे व त्यावर आधारित असणारे व्यवसाय/ त्यासंबंधातील पुरवठा साखळी.

२) पशुसंवर्धन शेती ज्यामध्ये पोल्ट्री फार्म, अंडी उबवन केंद्र व पशुधनपालन यांचा समावेश असेल.

३) पशु खादय निर्मिती केंद्रे त्यासाठी आवश्यक वनपस्ती व इतर आवश्यक कच्चा माल जसे की, मका, सोयबीन यांचा पुरवठा.

४) पशु धनाची निवारा केंद्रे गोशाळेसह

**क) वन विभागाशी संबंधित बाबी :**

१) किरकोळ वन उत्पादनाचे संकलन, वाहतूक, विक्री व साठवणूक

२) वनास आग लागू नये यासाठी वनामध्ये तात्पुरते साठवून ठेवलेल्या लाकडांचे संकलन व वाहतूक.

८) राज्य शासनाने वेळोवेळी विविध आदेश व मार्गदर्शक तत्वानुसार परवानगी दिलेल्या बाबी त्यामध्ये घालुन दिलेल्या प्रतिबंधासह चालू राहतील.

९) सदर आदेशाव्दारे विशिष्ट प्रकारे प्रतिबंध न केलेल्या इतर सर्व बाबी/ कार्यवाही यांना परवानगी राहील. तथापि परिस्थितीचा आढावा घेवून प्रसंगानुरुप कोव्हिड-१९ प्रतिबंध रोखण्यासाठी विशिष्ट प्रतिबंधासह काही बाबींना परवानगी देता येईल.

१०) आंतरराज्य, राज्यांतर्गत व आंतरजिल्हा माल वाहतूक व रिकाम्या ट्रक्सची वाहतूक सुरु राहील.

११) राज्य शासनाने दिनांक २२/०४/२०२० च्या आदेशान्वये घालून दिलेली आर्दश कार्यपध्दती.

१२) लॉकडाऊनमुळे अडकलेले मजूर, तिर्थयात्री, प्रवासी यात्रेकरु, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांचे हालचालीसाठी राज्य शासनाचे आदेश दिनांक ३०/०४/२०२० व १/०५/२०२० नुसार ठरवून दिलेली आदर्श कार्यपध्दती.

१३) **उपरोक्त मनाई आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक सूचना :**

१) जिल्हादंडाधिकारी व संबंधित प्राधिकारी यांनी वर नमूद टाळेबंदीची अंमलबजावणी व कोव्हिड-१९ मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी सार्वजनिक ठिकाणी व कामाचे ठिकाणी परिशिष्ट-१ नुसार करणे अत्यावश्यक आहे.

२) उक्त आदेशाचे अंमलबजावणी करण्यासाठी सर्व तहसीलदार यांची त्यांचे कार्यक्षेत्रात Incident Commander म्हणून या कार्यालयाचे आदेश क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/Incident Commander/आदेश/कावि-७३८/२० दिनांक १९/०४/२०२० अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व Incident Commander हे त्यांचे क्षेत्रात सदरील आदेशाची अंमलबजावणी व उपाययोजना करण्यासाठी जबाबदार असतील. सर्व Incident Commander यांनी सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. या कामसाठी इतर सर्व विभागाचे तालुकास्तरीय अधिकारी Incident Commander यांचे निर्देशानुसार काम करतील. Incident Commander यांनी सूट दिलेल्या व्यक्ती/आस्थापना यांना आवश्यक त्या पासेस वितरण करावे.

३) सर्व Incident Commander यांनी रुग्णालयाशी संबंधित सर्व अत्यावश्यक साहित्य, मजूर, संसाधने यांची कुठल्याही अडथळयाशिवाय जमवाजमव व एकत्रित करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे.

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधिताना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानूसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

उपोद्घातातील अ.क्र.९ मध्ये नमूद केलेल्या बाबींपैकी एखादी बाब सदर आदेशामध्ये नमूद नसल्यास शासनाच्या मुळ आदेशातील तरतुदी लागू राहतील.

सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ ते ६० मधील तरतुदीनुसार व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दिनांक ०३/०५/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत :-**

१) मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार कॉम्प्लेक्स बिल्डींग, नवीन मंत्रालय, मुंबई-०१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

६) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

७) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

८) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

९) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१०) जिल्हा आरोग्य अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

११) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१२) गट विकास अधिकारी पंचायत समिती वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१२) जिल्हा महिती अधिकारी पालघर यांना आवश्यक त्या प्रसिध्दीकरीता.

१३) मुख्याधिकारी, नगरपरीषद पालघर/जव्हार/डहाणू यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१४) मुख्याधिकारी, नगरपालिका मोखाडा/विक्रमगड/वाडा/तलासरी यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१५) पालघर जिल्हयातील सर्व शासकीय/निमशासकीय/महामंडळे/खाजगी आस्थापना यांना.

जिल्हादंडाधिकारी पालघर

## परिशिष्ट-१

## कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनासाठी मार्गदर्शक तत्वे

**सार्वजनिक ठिकाणे-**

१. सर्व सार्वजनिक ठिकाणी फेस मास्क वापरणे बंधनकारक आहे.

२. सार्वजनिक आस्थापना व परिवहनाच्या ठिकाणी सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनानूसार सामाजिक अंतर राखले जाईल यांची संबंधीत प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

३. पाचपेक्षा अधिक व्यक्तींच्या एकत्र येण्यास कुठलाही सार्वजनिक आस्थापना/ व्यवस्थापक परवानगी देणार नाही.

४. विवाह सारख्या सार्वजनिक कार्यक्रमात सामाजिक अंतर पाळणे बंधनकारक आहे. मात्र ५० पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास परवानगी असणार नाही.

५. अंत्यविधी सारख्या प्रसंगी सामाजिक अंतर पाळणे बंधनकारक आहे. मात्र २० पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास परवानगी असणार नाही.

६. सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कायद्यानूसार दंड आकारण्यात यावा.

७. सार्वजनिक ठिकाणी पान, तंबाखू, गुटखा, मद्य यांचे सेवन करण्यास मनाई राहील.

८. पान, तंबाखूची दुकाने पुर्णपणे बंद राहतील.

९. मद्याची विक्री करणाऱ्या दुकानानी एकमेकांपासून ६ फुटांचे अंतर पाळले जाईल यांची खात्री करावी. आणि दुकानात एकाच वेळी ५ पेक्षा अधिक व्यक्ती जमणार नाही याची खात्री करावी. राज्य उत्पादन शुल्क विभागाने यावर काटेकोरपणे नियंत्रण ठेवावे.

**कामाची ठिकाणे-**

१०. सर्व कामांच्या ठिकाणी फेस मास्क वापरणे बंधनकारक आहे. व अश्या मास्कचा पुरेसा साठा अशा ठिकाणी उपलब्ध असावा.

११. सर्व कामांच्या ठिकाणी आणि कंपनीच्या वाहतूक व्यवस्थे दरम्यान आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनानूसार सामाजिक अंतर राखले जाईल याची संबंधीत प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

१२. दोन पाळयांमध्ये सुयोग्य अंतर ठेवून तसेच भोजन अवकाश योग्य वेळेचा ठेवून व इतर मार्गाचा वापर करून कामाच्या ठिकाणी योग्य सामाजिक अंतर पाळले जाईल याची दक्षता घ्यावी.

१३. सर्व प्रवेश व निर्गम स्थानावर थर्मल स्कॅनिंग, सॅनिटाइझर व हात धुण्याची सुविधा उपलब्ध करावी. या शिवाय कामाच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात सॅनिटायझर, हँड वॉश उपलब्ध करून देण्यात यावे.

१४. सर्व कामाच्या ठिकाणाचे, सार्वजनिक सुविधांचे आणि मानवी संपर्कात येणारी सर्व ठिकाणी जसे की, दरवाजाचे हँडल आदींचे दोन पाळया दरम्यान तसेच वारंवार निर्जतूकीकरण करावे.

१५. ६५ वर्षावरील जेष्ठ नागरीक, यापूर्वी इतर आजार असलेल्या व्यक्ती, गरोदर महिला, १० वर्षाच्या खालील बालके, वैद्यकीय बाबी व अत्यावश्यक बाबी वगळता घरी राहतील यांची दक्षता घ्यावी.

१६. सर्व सार्वजनिक व खाजगी अधिकारी/ कर्मचारी यांना आरोग्य सेतू ॲपचा वापर बंधनकारक करावा. आरोग्य सेतू ॲपचा कर्मचाऱ्यामध्ये १०० टक्के वापर होईल हे पाहण्याची जबाबदारी संबंधीत आस्थापना प्रमुखांची राहील.

१७. मोठया बैठका (meetings) टाळाव्यात.

१८. कोव्हिड-१९ च्या रुग्णांचे उपचार करणारे हॉस्पीटल, क्लिनीक यांची यादी सार्वजनिक ठिकाणी प्रसिध्द

करावी. कोव्हिड-१९ चे लक्षणे एखादया कर्मचाऱ्यास आढळल्यास त्यांना तात्काळ अशा दवाखान्यात तपासणीसाठी पाठवावे. कोव्हिड-१९ चे लक्षणे आढळून येणाऱ्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यापूर्वी विलगीकरणासाठी विलगीकरण कक्ष नियोजित करुन ठेवावे.

१९. खाजगी / सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध नसल्यास योग्य त्या सामाजिक अंतरासह वाहतूक सुविधा उपलब्ध करून द्यावीत.

२०. स्वच्छतेची मानके पाळून संपर्क व्यवस्था व प्रशिक्षण देण्यात यावेत.

(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

जिल्हा दंडाधिकारी पालघर
जिल्हा पालघर